# प्रेस नोट

दिनांक –२८/०९/२०२२

आरोपी खाजगी इसम १) श्रीमती रूपाली हितेंद्र गुप्ते, ५० वर्षे, प्राचार्य, के.एल.तिवारी, आर्कीटेक्चर कॉलेज मिरा भाईंदर व २) श्री. संतोष रंगराव हुबाले, वय ४५ वर्षे, कार्यालयीन अधिक्षक, ३) श्रीमती श्रेया संतोष बने वय ४६ वर्षे, वरीष्ठ लिपीक, यांना लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतले बाबत. तसेच आरोपी लोकसेवक श्री. जितेंद्र रामदासजी निखाडे, वय ५४ वर्षे, सहा. संचालक, तांत्रिक व सह संचालक विभागिय कार्यालय, बांद्रा मुंबई यांनी लाचेची मागणी केल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने दि.२८/०९/२०२२ रोजी ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो /घटक | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | --- |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | १) आरोपी महिला खाजगी इसम श्रीमती रूपाली हितेंद्र गुप्ते, ५० वर्षे, प्राचार्य, श्रीमती के.एल.तिवारी, आर्कीटेक्चर कॉलेज मिरा भाईंदर<br>२) आरोपी खाजगी इसम श्री. संतोष रंगराव हुबाले, वय ४५ वर्षे, कार्यालयीन अधिक्षक, श्री.एल.आर.तिवारी, इंजिनिअरिंग कॉलेज मिरा भाईंदर<br>३) आरोपी महिला खाजगी इसम श्रीमती श्रेया संतोष बने वय ४६ वर्षे, वरीष्ठ लिपीक, श्री.एल.आर.तिवारी, कॉलेज, मिरा भाईंदर<br>४) आरोपी लोकसेवक श्री. जितेंद्र रामदासजी निखाडे, वय ५४ वर्षे, सहा. संचालक, तांत्रिक व सह संचालक विभागिय कार्यालय, बांद्रा मुंबई (वर्ग १) |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये |
| तडजोडीअंती ठरलेली लाचेची रक्कम | १५,०००/– रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | स्विकारलेली १५,०००/– रुपये |
| लाचेच्या रकमेसह एकुण ताब्यात घेतलेली रक्कम | ३,३०,०००/– रूपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तकारदार यांची मुलगी आर्कीटेक्चरचे शिक्षण घेत असुन ती शिकत असलेली अस्मिता कॉलेज ऑफ आर्कीटेक्चर ही शैक्षणिक संस्था बंद झाल्याने तिला के.एल.तिवारी, आर्कीटेक्चर कॉलेज मिरा भाईंदर येथे प्रवेश देवुन संस्था व अभ्यासक्रम बदलाबाबत सहसंचालक तत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई यांची परवानगी मिळवुन देण्याकरीता के.एल.तिवारी कॉलेजचे प्रिन्सिपल हया ३०,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडे दिलेल्या तक्रारीचे अनुषगांने दि.२७/०९/२०२२ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये १) रूपाली हितेंद्र गुप्ते, ५० वर्षे, प्राचार्या, श्रीमती के.एल.तिवारी, आर्कीटेक्चर कॉलेज मिरा भाईंदर यांनी सदरची रक्कम आरोपी क्र २. संतोष रंगराव हुबाले, वय ४५ वर्षे, कार्यालयीन अधिक्षक यांचेकडे देण्यास सांगितले त्याप्रमाणे तक्रारदार श्री.हुबाले यांना भेटले असता हुबाले यांनी सहसंचालक तत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई यांना देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रूपये रकमेची मागणी केली. त्याप्रमाणे आज दि. २८/०९/२०२२ रोजी आयोजित केलल्या सापळा कारवाईचे दरम्यान प्राचार्या श्रीमती रूपाली गुप्ते व कार्या.अधीक्षक हुबाले यांचे सांगण्यावरून त्यांचे कार्यालयातील वरीष्ठ लिपिक श्रीमती श्रेया संतोष बने यांनी लाचेच्या रकमेपैकी १५,०००/– रूपये स्विकारले.<br>तसेच सापळा कारवाई दरम्यान सहाय्यक संचालक जितेंद्र रामदासजी निखाडे, तांत्रिक व सह संचालक विभागिय कार्यालय, बांद्रा मुंबई यांनी अशाप्रकारे |

| | |
|---|---|
| | संस्था व अभ्यासक्रम बदलाबाबत सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई यांची परवानगी मिळवुन देण्याकरीता सदर लाच रकमेच्या मागणीस दुजोरा/सहमती दर्शविली आहे.<br>अशाप्रकारे सदर कारवाई दरम्यान विदयार्थ्यांना परवानगी देण्यासाठी प्रत्येक विदयार्थ्याकरीता ३०,०००/- रूपये याप्रमाणे १४ विदयार्थ्याकरीता ४,२०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे वरील आरोपीतांनी सांगितले. त्याप्रमाणे १० विदयार्थ्यांचे ३०,०००/- रूपये प्रमाणे ३,००,०००/- व एका विदयार्थीनीचे १५,०००/- रूपये या प्रमाणे जमा केलेली ३,१५,०००/- रूपये रक्कम विदयार्थ्यांचे नावाचे यादीसह हस्तगत करण्यात आली आहे.<br>सदर प्रकरणी आरोपी क्रमांक १,२,३ व सहा. संचालक जितेंद्र रामदासजी निखाडे, तांत्रिक व सह संचालक विभागिय कार्यालय, बांद्रा मुंबई यांना देखिल त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेण्यात आले आहे.<br>सदरबाबतची पुढील कार्यवाही मिरारोड पोलीस स्टेशन येथे सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–**

**१) मा.श्री. डॉ. पंजाबराव उगले, सो. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर तथा पोलीस अधीक्षक,(अति.कार्य.) ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**२) मा.श्री. अनिल घेरडीकर सो. अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :– लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेत स्थळ :–acbmaharastra@mahapolice.gov.in

ईमेल–spacbthane@mahapolice. gov.in

ॲप्लीकेशन –acbmaharastra.net

टोल फ्रि नंबर –१०६४

दुरध्वनी क्रमांक –०२२–२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटस्ॲप्स् क्रमांक –९९३०९९७७००

दिनांक :– २८/०९/२०२२

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.